REVIEW OF RESEARCH
IMPACT FACTOR : 5.7631(UIF) UGC APPROVED JOURNAL NO. 48514 ISSN: 2249-894X

VOLUME - 8 | ISSUE - 5 | FEBRUARY - 2019

# जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधींची भूमिका (विशेष संदर्भ भंडारा जिल्हा)

राहुल प्रकाश चुटे
संशोधनकर्ता , गोंडवाना विद्यापीठ, गडचिरोली.

## प्रस्तावना :



भारत हा देश विकसनशील राष्ट्रामध्ये अग्रगण्य मानला जातो. कारण या देशामध्ये लोकशाही व्यवस्थेचा प्रयोग यशस्वी झालेला आहे. त्यामुळे भारतात विकासाची प्रकिया जलद गतिने होतांना दिसत आहे. भारतामध्ये स्थानिक पातळीपासुन ते राष्ट्रीय पातळीपर्यंत विविध राजकीय संस्थाची निर्मिती करण्यात आली. यामध्ये पंचायत राज अंतर्गत येणारी जिल्हा परिषद, पंचायत समिती व ग्राम पंचायत यासारख्या संस्था महत्वपूर्ण कामगिरी पार पाडत आहेत. या संस्थामुळे ग्रामीण भागातील जनता राजकीयदृष्ट्या जागृत होण्यास मदत मिळाली. त्याचबरोबर यामधून ग्रामीण नेतृत्वाला चालना मिळाली. पंचायत राज व्यवस्थेमुळे स्थानिक समस्यांना वाचा फोडता आली. त्यादृष्टीने विकासात्मक पावले उचलने भाग पडले. यामध्ये लोकप्रतिनिधीची भुमिका महत्वाची आहे. जिल्हा परिषद ही मिनी संसद किंवा मिनी विधानमंडळ म्हणून ओळखली जाते. या संसदेमध्ये स्थानिक प्रश्नावर विचार विमर्श करुन जन सामान्याच्या समस्याचे निराकरण केल्या जाते. लोकप्रतिनिधी समाजातील गरजा, आशा आकांक्षा यासर्व गोष्टीचा आढावा घेवून त्या शासनापर्यंत पोहचवित असतो. शासनाच्या लोककल्याणकारी योजनांचा लाभ जास्तीतजास्त लोकांना कसा होईल या गोष्टीची विचार करून त्या पूर्ण करण्याची जबाबदारी ही त्या क्षेत्रातील प्रतिनिधीची असते. लोककल्याणकारी राज्याचे स्वप्न जिल्हा परिषद या संस्थेच्या अंतर्गत पूर्ण करण्याचे कार्य लोकप्रतिनिधींच्या माध्यमातुन केल्या जाते.

लोकशाही विकेन्द्रीकरणातून त्रिस्तरीय व्यवस्था निर्माण झाली. या मागचा मुख्य उद्देश ग्रामीण विकास करणे हा होता. त्रिस्तरीय व्यवस्थेमध्ये प्रमुख व सर्वोच्च स्थानी जिल्हा परिषद ही संस्था आहे. या जिल्हा परिषदेचे विविध कार्य आणि जबाबदाऱ्या आहेत. त्या पूर्ण करण्याचं उत्तरदायित्व हे तेथे निवडून गेलेल्या लोकप्रतिनिधींचे असते. जिल्हा परिषदेमध्ये कामे करतांनी लोक प्रतिनिधींना पक्ष, संस्था, संघटना या सर्वांच्या प्रभावात काम करावं लागते. लोकप्रतिनिधी जर एखाद्या पक्षाचा असेल तर त्याच्या कामावर पक्षाचा दबाव असतो. कारण तो पक्ष विरोधी भुमिका घेऊन कार्य करु शकत नाही. अशावेळी तो कोणता निर्णय घेतो हे भंडारा जिल्ह्यासंदर्भात पडताळुन पहायचे आहे. लोकप्रतिनिधीच्या सामाजिक, आर्थिक, शैक्षणिक, राजकीय, सांस्कृतिक व इतर भुमिका असतात. त्या तो कशा प्रकारे पार पाडतो याविषयी चिंतन करणे आवश्यक वाटते.

## प्रतिनिधित्व

दक्षिण भारतातील पल्लव चालुक्यांची राजवट यादृष्टीने अतिशय महत्वाची मानल्या जाते. त्यांच्या राज्यातील प्रत्येक ग्रामात सभा व समिती असे. समिती सदस्याची निवडणूक घेण्यात येत होती व त्यासाठी विशेष निकष ठरविण्यात आले होते. यामध्ये स्वच्छ चारित्र्य असलेला, आर्थिक अपहार न करणारा व्यसनी व लोभी नसणारा इत्यादी. समितीचा सदस्य म्हणून एखादा व्यक्ती तीन वेळा निवडून आला असेल तर त्याला समितीचा सदस्याची निवडणूक लढण्यास प्रतिबंध होता. निवडून आल्यानंतर ठरविलेल्या नियमांचे उल्लंघन केल्यास त्याला पदावरुन काढल्या जाई. यावरुन लोक प्रतिनिधी कसा असावा, त्याचे नेतृत्व कसे असावा या सर्व गोष्टी किंवा बाबी स्पष्ट होतात. योग्य व लायक प्रतिनिधी सर्वांच्या विकासाचा विचार करु शकतो हे मर्म त्याच्या पाठीशी होते.[१] अशा प्रकारे प्रतिनिधी विषयी पूर्वी सुध्दा बरिच माहिती मिळते.

LBP PUBLICATION

ग्रामिण क्षेत्राचा विकास करायचा असेल तर लोकप्रतिनिधी हा निष्पक्ष कार्य करणारा असावा. ज्या विश्वासावर तो परिषदेमध्ये निवडून जातो तो विश्वास सार्थक ठरविण्याचे काम त्याने केले पाहीजे. भंडारा जिल्हा परिषदेमध्ये एकूण ५२ सदस्य निवडून जातात. यामध्ये विविध जातीचे वेगवेगळी शैक्षणिक पात्रता असलेले तसेच विविध व्यवसाय करणारे लोक प्रतिनिधी असतात. या त्यांच्या सामाजिक जिवनाचा प्रत्यक्ष वा अप्रत्यक्षरित्या त्यांच्या भूमिकेवर पडत असतो. लोकप्रतिनिधीला विविध भूमिका पार पाडव्या लागतात. यामध्ये त्याची राजकीय भूमिका सुध्दा महत्वाची असते. कारण सर्वात जास्त प्रभाव या राजकीय व्यवस्थेचा लोकप्रतिनिधीवर पडत असतो. भडांरा जिल्हा परिषदेतील लोक प्रतिनिधीची भूमिका जाणून घेण्यासाठी निवडून आलेल्या २००५ ते २०१५ या कालावधीतील लोकप्रतिनिधीची प्रतिक्रिया मुलाखत अनुसूचीद्वारे जाणून घेण्यात आली व त्यांच्या भुमिकांचे अध्ययन करण्यात आले.

## लोकप्रतिनिधीची भूमिका :–

भंडारा जिल्हापरिषदे अंतर्गत विविध मतदार क्षेत्र येतात. या क्षेत्रामधून एक–एक प्रतिनिधी निवडला जातो. प्रत्येक प्रतिनिधी हा आपल्या क्षेत्राच्या विकासाचा दृष्टीने विचार करुन कार्य करित असतो. तस पाहीले तर जिल्ह्यातील सर्वाधिक क्षेत्राची समस्या ही काही प्रमाणात सारखी असते. अशावेळी ती समस्या सोडविण्यासाठी लोक प्रतिनिधी कोणती भूमिका पार पाडतात. हे खालील प्रतिक्रियावरून सांगता येईल.

## आर्थिक भूमिका

पंचायतराज व्यवस्थेचा महत्वाचा आदेश म्हणजे ग्रामीण क्षेत्राचा सर्वांगिण विकास करणे हा आहे. ग्रामीण व्यवस्थेला संपन्न करण्यासाठी तेथील अर्थव्यवस्थेला मजबूत करणे आवश्यक आले. यासाठी शासनाकडून प्रयत्न केले गेले पाहीजेत. ग्रामीण क्षेत्राच्या आर्थिक विकासात तेथील सक्षम लोकप्रतिनिधीची भूमिका महत्वाची आहे. लोक प्रतिनिधींची मतदार संघाची आर्थिक उंची वाढविण्यासाठी कोणती भूमिका पार पाडली ते पुढील आकडेवारीवरुन स्पष्ट होईल. ग्रामीण क्षेत्रामध्ये दळणवळण करण्यासाठी मजबुत रस्त्यांचे बांधकाम ५१ टक्के लोकप्रतिनिधीनी केले, ४३.९ टक्के लोक प्रतिनिधींनी बचत गटांना व तेथील उद्योगांना प्रोत्साहन दिले, ७३.५ टक्के लोक प्रतिनिधीनी शेती पुरक उद्योगांना प्रोत्साहन दिले, ८५.७ टक्के लोक प्रतिनिधींनी आधुनिक शेतीवर भर दिल्याचे लक्षात येते. आर्थिक उन्नतीसाठी महत्त्वाचा विषयांकडे लोक–प्रतिनिधींनी भर दिला आहे. रस्त्यांमुळे गावांचासपर्क वाढुन कृषी व इतर देवाण घेवाण वाढली.

भंडारा जिल्ह्यामध्ये सन २०१३–२०१४ या आर्थिक वर्षात दारिद्रय रेषेखालील ७६०५ बचत गट स्थापन होते तर त्यांची या वर्षातील आर्थिक उलाढाल ही ४१३ लाख इतकी होती.[२] बचत गटामधुन मोठ्या प्रमाणात आर्थिक उलाढाल होते व रोजगाराची संधी सुध्दा उपलब्ध होते. लोक प्रतिनिधींनी शेती पुरक व्यवसायांवर सुध्दा भर दिला आहे. यामध्ये शेळीपालन, मत्सपालन, कुक्कुटपालन, गोपालन इत्यादीचा समावेश होतो. तसेच आधुनिक शेतीसाठी सुधारित बि–बियाणे, आधुनिक यंत्र व सामुग्री, त्यासाठी प्रशिक्षण इत्यादीचा प्रबंध लोकप्रतिनिधीनी केला. यामुळे शेती करणे सोयीचे झाले आहे.

## शैक्षणिक भूमिका

व्यक्तिच्या सर्वांगिण विकासासाठी शिक्षण हा अत्यंत महत्वाचा घटक आहे. ग्रामीण क्षेत्र हा शिक्षणाच्या बाबतीत पूर्वीपासून मागास असल्याचे लक्षात येते. म्हणून ग्रामीण भागासाठी शासनाने विविध शैक्षणिक योजना राबविल्या आहेत. या शैक्षणिक कार्यामध्ये भंडारा जिल्ह्यातील लोक प्रतिनिधीची भूमिका व कार्य बघणे आवश्यक आहे. शैक्षणिक भूमिकांचे विश्लेषण पुढीलप्रमाणे आहे. जिल्हयातील लोकप्रतिनिधीकडून शैक्षणिक विकासासाठी विविध कामे करण्यात आली. यामध्ये ६४.३ टक्के लोकप्रतिनिधींनी इंग्रजी माध्यम सुरु करण्यावर भर दिला. ६२.२ टक्के लोकप्रतिनिधींनी शाळांचे संगणकीकरण केले. ५९.७ लोकप्रतिनिधींनी शालेय इमारतीचे बांधकाम केले, ५२ टक्के लोकप्रतिनिधींनी शैक्षणिक साहित्याचे वाटत केले, ३९.८ टक्के लोकप्रतिनिधींनी शालेय आवार भिंतीचे बांधकाम केले, ३०.६ टक्के लोकप्रतिनिधींनी अंगणवाडीचे बांधकाम केले, २८.६ टक्के लोकप्रतिनिधींनी शिक्षकांच्या भरतीसाठी प्रयत्न केले. याप्रमाणे जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी शैक्षणिक गुणवत्ता वाढीसाठी व साक्षरतेसाठी विविध प्रयत्न केले व त्यांच्या प्रयत्नांना बऱ्याचपैकी यश मिळाले.

सन २०११ च्या जनगणनेनुसार भारतात महाराष्ट्राचा साक्षरतेमध्ये १२ वा क्रमांक लागतो. त्याचे प्रमाण ८२.९१ टक्के आहे. पुरुष साक्षरता ८९.८२ टक्के आहे. तर महीला ७५.४८ टक्के साक्षर आहेत. महाराष्ट्रामध्ये भंडारा जिल्ह्याच्या बाबतीत विचार केला तर जिल्ह्याचे साक्षरतेचे प्रमाण २०११ च्या गणणेनुसार ८३.७६ टक्के आहे. यामध्ये पुरुष साक्षरता ९०.३५ टक्के आहे तर महीला

साक्षरतेचे प्रमाण ७७.०८ टक्के आहे. सन २००१ च्या गणणेनुसार साक्षरतेचे प्रमाण ७८.४७ टक्के एवढे होते.[३] हे प्रमाण सन २०११ च्या तुलनेत खुप कमी आहे. यावरुन असे लक्षात येते की, जिल्ह्यामध्ये लोकप्रतिनिधींच्या प्रयत्नांना यश मिळाले आहे.

### सांस्कृतिक भूमिका

भंडारा जिल्ह्याला सुध्दा सांस्कृतिक वारसा लाभला आहे. भंडारा जिल्हयात, दंडार, नाटक, नृत्य व इतर सांस्कृतिक कलांचे मोठ्या प्रमाणात आयोजन केले जाते. भंडारा जिल्ह्यामध्ये झाडीपट्टीतील नाटकांचे मोठ्या प्रमाणात जनतेला आकर्षण आहे. हा वारसा नेहमी टिकुन राहावा यासाठी लोकप्रतिनिधी प्रयत्न करतात व अशा विविध सांस्कृतिक कार्यक्रमाचे आयोजन दरवर्षी सनानिमित्य करित असतात. याबाबत लोकप्रतिनिधींच्या विविध प्रतिक्रिया मिळाल्या. यामध्ये सांस्कृतिक लोककलांना चालणा देण्यासाठी ३५.६ टक्के लोकप्रतिनिधीनी मंडईचे आयोजन केले. ८.९ टक्के प्रतिनिधींनी शालेय स्नेहसम्मेलनाचे आयोजन केले. ३४.४ टक्के लोकप्रतिनिधीनी विविध नाटकांचे आयोजन केली, ५.६ टक्के एककांनी लोक शाहीरांना अनुदान मिळवून दिले तर १.१ टक्के लोकप्रतिनिधींनी कोणतेही प्रयत्न केले नाही. १४.४ टक्के एककांनी दंडारीचे आयोजन केले. भंडारा जिल्ह्यातील लोकप्रतिनिधीची आपल्या क्षेत्राच्या जनतेच्या आवडीनुसार विविध कलांचे आयोजन केले आहे.

उपरोक्त केलेले कार्य हे अत्यंत स्वागतार्ह असले तरी त्याचे प्रमाण बघता लोक प्रतिनिधीमध्ये सांस्कृतिक वारसा जपण्यामध्ये उदासिनता दिसून येत असल्याचे लक्षात येते. कारण लोकप्रतिनिधींनी विविध कार्यक्रम राबविले परंतू मोजकेच प्रतिनिधी यामध्ये सक्रिय आहेत. अत्यंत महत्वाचे कार्य म्हणजे लोकशाहीरांना शासनाचे अनुदान मिळवून देणे यामुळे शाहीरांना रोजगार व प्रोत्साहन मिळून शाहीरी व दंडारीचे प्रकार जे समाजातून लुप्त होत आहेत त्यांची जपवणुक करण्यास मदत मिळाली.

### राजकीय भूमिका

'अधिमान्य आज्ञापक सत्तेसंबंधी माणसांचे व्यवहार म्हणजे राजकीय होय.'[४] ज्याप्रमाणे लोकप्रतिनिधला सामाजिक, सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक भूमिका असतात त्याचप्रमाणे राजकीय भूमिका सुध्दा असते. राजकीय भूमिकामध्ये राजकीय वर्तन, पक्षनिष्ठा, संघटनामधील कार्य, लोकांमध्ये राजकीय संगोष्ठी व इतर काही भूमिका असतात. राजकीय भूमिकांमध्ये लोकांच्या समस्या शासनासमोर मांडणे, ठराव पास करणे, शासनावर दबाव टाकणे व इतर सारख्या भुमिकांचा समावेश असतो. भंडारा जिल्ह्यातील ३१.६ टक्के लोक प्रतिनिधींना राजकीय पार्श्वभूमी असल्याचे लक्षात येते. ती वेगवेगळया स्वरुपाची आहे. यामध्ये महीलांचे प्रमाण सर्वाधिक ६३.९ टक्के आहे. हे प्रमाण महिला सद्याच्या संयेवरून आहे.

राजकीय भुमिका पार पाडतांना ९५.९ टक्के लोक प्रतिनिधींची शासनाच्या योजना जनतेपर्यंत पोहचविण्यासाठी जनजागृती केलेली आहे, तसेच जिल्हा परिषदेचा निधी वाढविण्यासाठी १६.३ टक्के लोकप्रतिनिधींनी शासनाकडे सुचना केल्या तर ७९.६ टक्के लोकप्रतिनिधींनी शिक्षक भरतीचे प्रस्ताव किंवा निवेदन पाठविले तसेच जिल्ह्यातील एकूण लोक प्रतिनिधीपैकी संपूर्ण १०० टक्के लोक प्रतिनिधी हे आपल्या पक्षाचे आदेश पाळतात व पक्षाने ठरविलेल्या योजनांचे पालन करतात. प्रत्येक पक्षाचा एक राजकीय जाहीरनामा असतो त्यानुसार लोकप्रतिनिधींना कार्य करणे आवश्यक असते. जनतेला राजकीदृष्टया जागृत करण्याचे काम सुध्दा लोकप्रतिनिधी पार पाडीत असतात. जिल्ह्यातील लोकप्रतिनिधी हे जनतेच्या समस्या शासनापर्यंत पोहचविण्याचे काम सक्रियतेने पार पाडतात.

अशाप्रकारे भंडारा जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधींच्या भूमिका आहेत व त्या योग्य पध्दतीने पार पाडीत असल्याचे आकडेवारी वरुन लक्षात येते. तसेच लोक प्रतिनिधींच्या प्रयत्नांमुळे ग्रामीण क्षेत्रातील मतदार जागृत होत आहे. तो प्रतिनिधी कामाचा आढावा घेत आहे. यावरून राजकीय सहभाग वाढत असण्याचे अध्ययनात स्प्ष्ट होते.

### निष्कर्ष

भंडारा जिल्हा परिषदेतील लोकप्रतिनिधी हे सामाजिक सांस्कृतिक, आर्थिक, शैक्षणिक व राजकीय भूमिका योग्यप्रकारे पार पाडीत असले तरी यासर्वच भूमिकांमध्ये लोकप्रतिनिधी पूर्णपणे सक्रिय नाहीत. आर्थिक कामांमध्ये लोक प्रतिनिधींनी बरेचसे कामे पार पाडली त्यामुळे काही प्रमाणात रोजगार व जिल्हयाला महसूल प्राप्त झाला. शिक्षणाच्याबाबतीत सुध्दा लोकप्रतिनिधीच्या प्रयत्नामुळे जिल्ह्यात साक्षरतेचे प्रमाण वाढले आहे. परंतू सांस्कृतिक वारसा जपण्यामध्ये लोकप्रतिनिधींनी पाहीजे तसे काम केले नाही. म्हणून जिल्ह्याचा सांस्कृतिक वारसा लयास जात असल्याचे लक्षात येते. याबाबत लोकप्रतिनिधी उदासीन आहेत. राजकीय जबाबदारी ते योग्यपध्दतीने पार पाडीत असले तरी यामध्ये सुध्दा त्यांचे प्रमाण खुप कमी आहे लोक प्रतिनिधीमध्ये पक्षाविषयी निष्ठा असल्याचे लक्षात येते. ज्यामुळे ते पक्षाने दिलेल्या निर्देशानुसार असे करित असतात. एकंदरित लोकप्रतिनिधीनी ज्या भूमिका वाढविल्या व वाढवित आहेत त्यामुळे जिल्ह्याचा विकास पूर्वीपेक्षा मोठया प्रमाणात झालेला आहे.

जिल्ह्यातील लोकप्रतिनिधींनी आपल्या विविध भूमिका पार पाडत असतांना निश्वार्थाची भावना जपणे आवश्यक आहे. लोककल्याणाच्या दृष्टीने प्रतिनिधींनी बघीतले तर जिल्ह्याचा विकास झपाट्याने होईल हे त्यांनी केलेल्या कामावरुन लक्षात येते.

## संदर्भ सूची :–


१) भारत का इतिहास, रोमिला थापर, राजकमल प्रकाशन, नई दिल्ली, १९९९, पृ. – १५२–१६२

२) जिल्हा सामाजिक व आर्थिक समालोचन – २०१४, भंडारा जिल्हा अर्थ व सांख्यिकी संचालनालय, महाराष्ट्र शासन, मुंबई, पृ. – ५

३) District Census Handbook Bhandara, Census of India 2011 Maharashtra, Series – 28, Part XII-B, Page-11

४) राजकीय नेतृत्व, डॉ. ना. रा. खेकाळे, श्री मंगेश प्रकाशन, नागपूर, पृ. – ४


LBP PUBLICATION